# “ ज्ञानाची शेती ”

# कृषि निविष्ठा खरेदी करत असताना याची खात्री करा

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

### बियाणे, रासायनिक खते, किडनाशके विकत घेताना काय काळजी घ्यावी ?

सद्याचे शेती पध्दतीमध्ये शेतकरी शेती व्यवसाय करत असताना जवळपास 100% बाजारावर अवलंबून आहे म्हणजेच शेतकऱ्याला त्याचे पिकासाठी, शेतीसाठी दररोजच काही ना काही विकत घ्यावे लागते. त्यामध्ये बियाणे, रोपे, रासायनिक खत, शेणखत, गांडूळ खत, लिंबोळीपेंड, किडनाशके ह्या निविष्ठा खरेदी कराव्या लागतात तर मजूर, ट्रक्टर, औजारासह फवारणी यंत्रे जसे की ड्रोन, पिक काढणीसाठी हार्वेस्टर इ. च्या सेवा भाड्याने घ्यावा लागतात. म्हणजेच आजची शेती ही सर्वस्वी बाहेरच्या बाजारातील निविष्ठा व सेवेवर अवलंबून आहे व त्यासाठी शेतकऱ्यास नगदी मोबदला अदा करावा लागतो. जेंव्हा शेतकऱ्याला या सेवा, सुविधा व निविष्ठा खरेदी करावयाचे असतात त्यावेळी कोणती काळजी, दक्षता घ्यावी याबाबत आज आपण माहिती घेणार आहोत.



### निविष्ठा खरेदी नियोजन :-

येणाऱ्या खरिप हंगामासाठी आपल्याकडील एकूण किती क्षेत्रावर पेरणी करावयाची आहे ? व त्यामध्ये कोणती पिके व वाण वापरावयाचे आहेत याबाबत एक आराखडा शेतकऱ्यांनी तयार करावा. त्यामुळे आवश्यक बियाणे, रासायनिक खते, सेंद्रिय खते, तसेच बिजप्रक्रियासाठी आवश्यक जैविक खते, किडनाशके, तणनाशके याची माहिती घेऊन त्याप्रमाणे आर्थिक तरतूद करून वेळेत खरेदी केल्यास ऐन हंगामामध्ये आपणास पाहिजे त्याच निविष्ठा मिळतील व या निविष्ठांचे दर्जामध्ये तडजोड करण्याची गरज पडणार नाही .

**बियाणे खरेदी करत असताना काय पाहावे :-**

- शेतकऱ्यांनी निवडलेला वाण हा आपल्याकडील जमिन, हवामान व लागवडीचे हंगामासाठी कृषी विद्यापीठांनी, बियाणे उत्पादकाने शिफारस केलेला आहे का ? याची खात्री करावी.
- सदरचा वाण बागायती आहे कि ? कोरडवाहू ?
- मिळालेल्या वाणाचे उत्पादनाबाबत स्वत: शेतकरी व ईतर शेतकऱ्यांचे आजपर्यंतचे अनुभव काय आहेत ?
- उत्पादक व विक्रेत्यांकडून सदर वाणाची संपूर्ण माहिती घेवून तो आपल्या हवामानासाठी शिफारस असेल तर त्याची निवड करावी.
- सुधारित जातीचे बियाणे दर 3 वर्षानी बदलावे, दरवर्षी नव्हे. उदा. भात, सोयाबीन, मूग, उडीद ई.
- संकरित वाणाचे बियाणे दर वर्षी, दर हंगामासाठी बाजारातून विकत घ्यावे.
- रोपांची लागवड करावयाची असेल तर आपण निवड केलेल्या वाणांचे रोप तयार करून घेण्यासाठी खात्रीचे व उत्तम दर्जाची रोपे पुरवठा होण्यासाठी विश्वासू, उच्च गुणवत्तेचे निकष पाळणाऱ्या रोपवाटिकेकडे आगाऊ नोंदणी करावी.



- किती क्षेत्रावर लागवड करावयाची आहे? निवडलेल्या वाणाची लागवड किती अंतरावर करण्याची शिफारस बियाणे उत्पादकाने केलेली आहे? त्यानुसार बियाणाचे पॅकिंग व एकूण बियाणेची गरज ठरवा व त्याप्रमाणे तेवढेच बियाणे विकत घ्या.
- नोंदणीकृत (परवाना धारक) विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदी करावे.
- विक्रेत्याकडून बियाणे खरेदी करताना पक्की पावती घ्यावी. त्यामध्ये सर्व माहिती जसे की बियाणाचा प्रकार, वाण, उत्पादकाचे नाव, बॅच नंबर, उत्पादन दिनांक, वापरण्याचा अंतिम दिनांक, पॅकिंगची तारिख, एकूण रक्कम व विक्रेत्याची स्वाक्षरी हे तपासून पहा.
- बियाणेचे पिशवी / बॅगवर दोन प्रकारचे लेबल (चिठ्ठी) असतात त्यामध्ये प्रमाणित व सत्यतादर्शक बियाणे यामधील फरक माहिती करून घ्या.
- शक्यतो प्रमाणित बियाणे (निळे लेबल) विकत घ्या. चिठ्ठीवर (लेबलवर) बियाणाबाबतची वरिल सर्व माहितीसह बॅच क्र, बियाणाची शुध्दता, उगवणक्षमता, वजन ई. ची खात्री करून बियाणे खरेदी करावे.

बियाणे खरेदी केल्यानंतर बियाणाची पिशवी फाडतांना त्यावर असलेले लेबल न काढता पिशवी उलट्या म्हणजेच खालच्या बाजूने फोडावी. बियाणे पेरताना मुठभर बियाणे त्याच पिशवीत पिकाची काढणी होईपर्यंत खरेदी पावतीसह जपून ठेवा.

फायद्याची व आरोग्यदायी..!

बियाणे उगवणीचे संदर्भात काही अडचण आल्यास संबंधित बियाणे उत्पादक, विक्रेता व कृषी विभागाचे स्थानिक कार्यालयात रितसर लेखी अर्ज देऊन त्याची पोहोच घ्यावी व याबाबतचा पाठपुरावा करावा.

**रासायनिक खताची निवड कशी करावी ? :-**

आपल्याकडील जमिनीतून मातीचा नमूना काढून तपासून घ्यावा व त्या अहवालामध्ये शिफारस केलेल्या रासायनिक खताचा शक्यतो वापर करावा.

आपण येणाऱ्या हंगामात कोणत्या प्रकारच्या जमिनीत कोणत्या पिकाची लागवड करणार आहोत व त्यासाठी लागणारे रासायनिक खताची निवड करावी. जसे की भारी जमिनीसाठी 3 बॅग सिंगल सुपर फॉस्फेट पावडर स्वरूपातील जर सोयाबिन पिकासाठी वापरले तर त्यामधून स्फुरद तर मिळेलच पण त्यासोबत कॅल्शियम 18.21% व गंधक 11-12% आपल्या जमिनीस मिळेल. भाताचे पिकासाठी युरीया ऐवजी अमोनियम सल्फेटचा वापर, भुईमूग, सोयाबिन, सूर्यफूल या सारख्या गळीत धान्य पिकासाठी 20:20:0:13, 24:24:0:08, जिप्सम, सिंगलसुपर फॉस्फेट करावा.

कडधान्य पिकासाठी नत्राची मात्रा कमी असलेली खते जसे की 12:32:16 चा वापर करावा केवळ डीएपी ते पण **" सम्राट "** युरिया तो पण **" सुफला "** पाहिजे हा आग्रह धरू नये. संयुक्त खते मग ते कोणत्याही उत्पादकाची असली तरी त्यांचा दर्जा हा सारखाच असतो. त्यामुळे अनावश्यक एकाच ब्रँडचे मागे लागू नये व बाजारामध्ये गैरप्रकारास हातभार लावू नये. शक्यतो नत्र, स्फुरद, व पालाश उपलब्ध करून देणाऱ्या संयुक्त खताचा वापर करावा. मिश्र खतांचे दर्जाबाबत खात्री करून वापरावीत किंवा त्यांचा वापर टाळलेलाच बरा. सुक्ष्ममूलद्रव्यांचे ग्रेड - I चे भरपूर प्रकार बाजारात उपलब्ध आहेत त्याचा वापर खरीप / रब्बी या पिकासाठी मातीमधून करण्याऐवजी त्यांची फवारणी केली तर त्याची पूर्तता होत असते. यावर विचार व्हावा.



- कडधान्य / गळीत धान्य पिकास नत्रयुक्त खताचा वापर शिफारशी एवढाच करावा. पेरणीनंतर या पिकास युरियाचा वापर करू नये.
- पेरणी ही BBF ट्रॅक्टर चलित यंत्राद्वारेच बियाणे व खत एकाचवेळी, रासायनिक खते बियाणाचे खाली पडेल याची खात्री करूनच करावी.

खरीप, रब्बी व 3-4 महिण्याचा कालावधी असलेल्या हंगामी पिकास रासायनिक खतांचा वापर हा पेरणीचे (Basal Dose) वेळीच करावा म्हणजे स्फुरद व पालाश पिकांचे गरजेप्रमाणे उपलब्ध होत असते. नत्रयुक्त खतांचा वापर खुरपणीनंतर म्हणजेच एक महिण्यांनी काही पिकामध्ये शिफारस केलेली आहे. उदा. मका यांचेसाठीच करावा.

कोणतेही खत वापरताना खताचे 4 R लक्षात ठेवावेत. कोणते खत, कोणत्या वेळी, कोणत्या ठिकाणी व किती द्यायचे हे महत्वाचे आहे. कोणतेही खत किती देता यापेक्षा कधी देता, कसे देता कुठे देता यास जास्त महत्व आहे.

**किडनाशकांची खरेदी** :-

येणाऱ्या हंगामासाठी आपण निवडलेल्या पिकांचे बिजप्रक्रिया, तणनाशके व किड व रोग व्यवस्थापनासाठीचे किडनाशकांची एकूण गरज किती आहे याचा आराखडा करावा.

पिकनिहाय लागणारे किटकनाशके, बुरशीनाशकांची कृषी विद्यापीठ व केंद्रिय किटकनाशक मंडळ तथा नोंदणी समितीने शिफारशी ची यादी करावी व किड व रोगांचा प्रकोप किंवा प्रार्दूभाव वाढण्यासाठी कोणते हवामान अनुकूल असते याबाबत माहिती घ्यावी. किडींची ओळख, नुकसानीचा प्रकार, आर्थिक नुकसाची पातळी, रोगांसाठी अनुकूल हवामान, तापमान, आर्द्रता ची पातळी कशी असल्यावर प्रार्दूभाव वाढतो याची माहिती घ्यावी निरिक्षण करावे. पिकावर येणारे जैविक, अजैविक ताण याबाबत शेतकऱ्यांनी आपण निवडलेल्या पिकाबद्दलची संपूर्ण शास्त्रोक्त माहिती विविध अधिकृत माध्यमांकडून जसे की कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, कृषी विभाग व ईतर शासकिय यंत्रणेकडून घ्यावी. खाजगी समाजमाध्यमावर फार विश्वास ठेवू नये.



किड व रोग व्यवस्थापनासाठी कोणते किडनाशक वापरता त्यापेक्षा ते कधी वापरता, किती वापरता, कधी फवारता, कोणत्या पंपाने फवारता ह्या गोष्टी जास्त महत्वाच्या आहेत. सुरूवातीस प्रतिबंधात्मक उपाय योजना अंतर्गत वनस्पतीजन्य (लिंबोळी अर्क) नंतर जैविक किडनाशके जसे की, लेक्यानीसिलियम लेक्यानी, मेटारायझम ॲनीसोप्ली, बॅसिलस सबटिलीस, नोमुरिया रिलाई यांची फवारणी घ्यावी व किडीनी आर्थिक पातळी ओलांडल्यावर शिफारस असलेल्या रासायनिक किडनाशके शिफारशीतील मात्रेत घेवून सकाळी / सायंकाळी फवारावीत.

जैविक किडनाशंकाची खरेदी ही खात्रीचे उत्पादकांकडून करावी. त्याचे दर्जाबाबत जास्त चौकस राहाण्याची गरज आहे. ही जैविक बुरशीनाशके / किडनाशकांचे आळवणी अथवा फवारणी केल्यानंतर 10-15 दिवस किंवा वापरण्यापूर्वी 10 दिवस कोणत्याही रासायनिक किडनाशकांचा वापर करू नये. दरवेळी फवारणीसाठी वेगळ्या गटातील रसायने वापरावीत जेणेकरून किडी, बुरशीची किडनाशकांप्रती प्रतिकार क्षमता विकसित होणार नाही.

आपण घेत असलेल्या पिकासाठी फक्त केंद्रिय किटकनाशक मंडळ तथा नोंदणी समिती व कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेलीच किडनाशके व तिही शिफारशीतील मात्रेतच, वारा शांत असताना, जमिनीत ओल असताना, सकाळी किंवा सायंकाळी वापरावीत, जेणेकरून त्यांची परिणामकारकता चांगली राहिल व विषमुक्त अन्न तयार करता येईल,



**ह्युमिक ॲसिड, रासायनिक किडनाशकांच्या आळवण्या व टॉनिकचा वापर** :-

येणाऱ्या हंगामात बियाणे वापरण्यासोबत उगवण चांगली व्हावी म्हणून, पांढरी मूळी चालावी म्हणून ह्युमिक ॲसिड चा पेरणीसोबत एकरी 5-10 किलो वापर करावा, यासाठी सर्व उत्पादक मंडळी आपल्या जाहिराती विविध यु ट्यूब चॅनल, फेसबुक, इंस्टाग्राम वरून करतीलच. त्याचसोबत कृषि सेवा केंद्राकडून जास्त फांद्या फूटण्यासाठी, फुलकळी निघण्यासाठी, फुलगळ होऊ नये म्हणून, सेटींग होण्यासाठी, शेंगा भरण्यासाठी, म्हणून वेगवेगळ्या प्रकारची टॉनिक (PGR, PGP, PGI) किटकनाशक व पाण्यात विरघळणाऱ्या खतांसोबत घेण्याबाबत खूपच आग्रह करतात व हे करत असताना शेतकऱ्यांचा उत्पादन कमी करून उत्पादन वाढविण्याचा आव आणतील पण अशा आग्रहास अजिबात बळी पडू नका.

**मित्रांणो ! खरच या सर्वाची गरज नाही !**

कृपया कोणत्याही जाहिरातीस, आग्रहास, दिशाभूल करणाऱ्या यू ट्यूब वरिल माहितीस बळी पडू नका ह्युमिक ॲसिड व टॉनिक अजिबात खरेदी करू नका. पिकास द्यावयाचे असेल तर पिक अवस्थेनुसार पाण्यात विरघळणारी खते फवारा, वेळेत पेरणी करा, बिजप्रक्रिया करा, उगवणपूर्व तणनाशके वापरा, किड रोग पाहणी करून सुरूवातीस स्वस्त, साधी किडनाशके व नंतर आवश्यकतेनुसार महागातील किडनाशके वापरा तर आणि तरच शेती ही फायद्याची, किफायतशीर, परवडणारी व आरोग्यदायी होणार आहे त्यासाठी ज्ञानाच्या शेतीची कास धरा.

येणारा खरीप हंगामात वेळेवर व पिकाचे गरजे प्रमाणे पाऊस पडो व शेतकऱ्यांना हा हंगाम फायद्याचा होवो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**धन्यवाद !**

निविष्ठांविषयी च्या अडचणी, तक्रारीसाठी आणि अन्य मार्गदर्शनासाठी **कृषि विभागाच्या टोल फ्रि क्रं. 18002334000** वर संपर्क करावा.

**खरीप हंगामासाठी मन:पूर्वक शुभेच्छा ।।।**